| MHLA130000212026 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र ८०/२०२६<br>कुमुदीनी वि. निरंक |
|---|---|

**निशाणी क्र.१ वरील आदेश**

**०१.** प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम २ मधील तदतुदींप्रमाणे 'वारस प्रमाणपत्र' (Heirship Certificate) मिळण्याची मागणी केलेली आहे.

**०२.** अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, मयत नामदेव कृष्णंत उर्फ किसन पंडगे हे अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील आणि अर्जदार क्र. ३ यांचे आजोबा आहेत. अर्जदारांव्यतिरीक्त मयत नामदेव कृष्णंत उर्फ किसन पंडगे यांना अन्य कोणीही वारस नाहीत. मयत नामदेव कृष्णंत उर्फ किसन पंडगे हे दि.१०.०७.२०२४ रोजी मौजे सिंधगाव ता. रेणापूर जि. लातूर येथे मयत झालेले आहेत. मयत नामदेव कृष्णंत उर्फ किसन पंडगे यांचे शासकीय कार्यालयात अर्जदार यांचे नावाची वारस नोंद लावण्यासाठी गेले असता त्यांना वारस प्रमाणपत्र आणण्याविषयी सांगितले. सबब, अर्जदार हे मयत नामदेव कृष्णंत उर्फ किसन पंडगे यांचे कायदेशीर वारस असल्याने वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता विनंती केली आहे.

**०३.** अर्जदारांनी केलेल्या मागणीविरुध्द कोणास काही हरकत असल्यास ती नोंदविण्यासाठी दि.२६.०३.२०२६ रोजी जाहिरनामा दैनिक 'यशवंत ' मध्ये जाहीर प्रगटन नि.१३ अन्वये प्रसिध्द करण्यात आले. नि.०८ कडील जाहिरनाम्याचा अहवाल पाहता दि.२७.०३.२०२६ रोजी सदरचा जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आलेला आहे. परंतु अर्जदारांच्या मागणीविरुध्द कोणीही हरकत नोंदविलेली नाही अथवा न्यायालयासमक्ष हजर होऊन वारसा प्रमाणपत्राची मागणी केली नाही.

**०४.** अर्जदारांनी त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ अर्जदार विनोद यांचे सरतपासणीचे शपथपत्र नि.१४ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदारांनी या प्रकरणात नि.०४ सोबत मयताचे मृत्यु प्रमाणपत्र, अर्जदारांचे आधार कार्डच्या छायांकित प्रत

आणि मयत नामदेव पंडगे यांचा दुसरा मुलगा राजेश पंडगे याचे व राजेश पंडगे याची पत्नी सरिता पंडगे व  मुलगी समृध्दी पंडगे यांचे मृत्यु प्रमाणपत्रची छायांकीत प्रत दाखल केले आहेत.

**०५.** अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदाराच्या मागणीविरुध्द कोणीही हरकत अथवा आक्षेप न नोंदविल्यामुळे अर्जदार हे मयत नामदेव कृष्णंत उर्फ किसन पंडगे  यांचे वारस असल्याचे निर्विवादपणे स्पष्ट होते. अर्जदाराचे कथन निर्विवाद राहील्याने अर्जदारांच्या कथनावर विश्वास न ठेवण्यासारखे काहीही दिसून आले नाही. त्यामुळे अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी पुढील आदेश पारित करीत आहेः–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो

२. अर्जदार क्र.१ कुमुदीनी नामदेव पंडगे, अर्जदार क्र.२ विनोद नामदेवराव पंडगे व अर्जदार क्र. ३ प्रणव राजेश पंडगे  हे मयत नामदेव कृष्णंत उर्फ किसन पंडगे रा. सिंधगाव ता. रेणापूर जि. लातूर यांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र् (Legal Heirship Certificate) योग्य त्या न्यायालयीन शुल्क मुद्रांकावर देण्यात यावे.

Digitally signed by POOJA ANAND APTE
Date: 2026.06.16 16:29:00 +0530

**(पी.ए.आपटे)**

**दि.१६.०६.२०२६.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,रेणापूर.**